महाराष्ट्र पोलीस

महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

**(महाराष्ट्र पोलीस राजपत्र, विभागीय, भाग-६ अ करिता)**

क्र.पोमसं/३/१०/६/निवडणूक आयोग-सूचना/१९०/२०२३
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय,
शहीद भगत सिंह मार्ग, कुलाबा, मुंबई-४०००01.
दिनांक :-०४/०३/२०२४.

वाचा :-
१. महाराष्ट्र पोलीस कायदा-१९५१,
२. मा.केंद्रीय निवडणूक आयोग, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.437/6/1/INST/ECI/ FUNCT/ MCC/2023, दि.२१/१२/२०२३ चे पत्र
३. या कार्यालयाचे समक्रमांकित, दि.०३/०१/२०२४ चे ज्ञापन
४. या कार्यालयाचे समक्रमांकित, दि.३०/०१/२०२४ चे आदेश.
५. मा.मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे क्र.जीईएन-२०२४/प्र.क्र.१४१/२४/३३, दि.२२/०२/२०२४ चे पत्र
६. या कार्यालयाच्या समक्रमांकित, दि.२२/०२/२०२४ चे ज्ञापन
७. मा.केंद्रीय निवडणूक आयोग, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.437/6/1/INST/ECI/ FUNCT/ MCC/2023, दि.२३/०२/२०२४ चे पत्र
८. या कार्यालयाचे समक्रमांकित, दि.२४/०२/२०२४ चे ज्ञापन
९. पोलीस आस्थापना मंडळ क्र. २ यांचे दि.२६/०२/२०२४ च्या बैठकीचे इतिवृत्त
१०. मा.मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे क्र.जीईएन-२०२३/प्र.क्र.७५१/२३/३३, दि.२७/०२/२०२४ चे पत्र.

*****

लोकसभा सार्वत्रिक निवडणूका-२०२४ च्या अनुषंगाने उपरोक्त संदर्भ क्र. २ च्या पत्रान्वये, मा.केंद्रीय निवडणूक आयोग, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मार्गदर्शक सूचना / निर्देशांनुसार सर्व पोलीस आयुक्त व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक या घटक प्रमुखांकडून बदलीपात्र पोलीस निरीक्षकांची माहिती उपरोक्त संदर्भ क्र. ३ च्या ज्ञापान्वये मागविण्यात आली होती. त्यानुसार सर्व संबंधित घटक प्रमुखांकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावातील माहितीची छानणी करुन छानणीअंती बदलीपात्र पोलीस निरीक्षकांची बदली करण्याकरिता महाराष्ट्र पोलीस अधिनियम-१९५१ मधील कलम २२ न(२) अन्वये, पोलीस आस्थापना मंडळ क्र. २ यांनी दिलेल्या मान्यतेनुसार, उपरोक्त संदर्भ क्र. ४ च्या आदेशान्वये एकूण १३० पोलीस निरीक्षकांची त्यांचे घटकातून इतर घटकात बदली करण्यात आली होती.

२. संदर्भ क्र.४ च्या आदेशास काही पोलीस निरीक्षकांनी मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे आव्हानित केलेले आहे व मा.न्यायाधिकरणाने सदर प्रकरणी मा.मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांना बदली आदेशांची पडताळणी / तपासणी करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्याअनुषंगाने मा.मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांनी दि.२१/०२/२०२४ रोजी संबंधित घटक प्रमुखांची बैठक आयोजित करुन दि.२२/०२/२०२४ च्या पत्रान्वये प्रस्तुत प्रकरणी करावयाच्या कार्यवाहीबाबत मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत.

३. संदर्भ क्र. ४ च्या आदेशान्वये १३० पोलीस निरीक्षकांच्या बदल्या करण्यात आल्या होत्या. तथापि, मा.मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी पोलीस आयुक्त, पुणे शहर / पिंपरी-चिंचवड / ठाणे शहर / सोलापूर शहर व विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र यांनी केलेल्या बदल्यांची व उपरोक्त नमूद घटकांतील पोलीस निरीक्षकांच्या या कार्यालयाने दि.३०/०१/२०२४ (संदर्भ क्र.४) च्या आदेशान्वये केलेल्या बदल्यांच्या अभिलेखाची मा.मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचे कडून मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या निर्देशानुसार दि.२१/०२/२०२४ रोजी पडताळणी करण्यात आली आहे. त्यापैकी या कार्यालयाने संदर्भ क्र.४ अन्वये बदली केलेले पोलीस आयुक्त, पुणे शहर (०२) / पिंपरी-चिंचवड (१३) / ठाणे शहर (०७) / सोलापूर शहर(००) व विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर



Scanned with OKEN Scanner

परिक्षेत्र (०१) अशा एकूण २३ पोलीस निरीक्षक जे दि.२१/१२/२०२३ रोजी Functional पदावर कार्यरत होते, त्यांना आयोगाच्या निकषाप्रमाणे जिल्ह्याबाहेर बदली करण्यापासून सवलत आहे, असे मा.मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचे दि.२२/०२/२०२४ (संदर्भ क्र.५) च्या पत्रान्वये या कार्यालयास कळविण्यात आले आहे. तसेच संदर्भ क्र.५ अन्वये इतर घटकांच्या बाबतीत या कार्यालयाचे स्तरावर तपासणी / पडताळणी करुन आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

४. त्याअनुषंगाने या कार्यालयाने दि.३०/०१/२०२४ (संदर्भ क्र.४) रोजी निर्गमित केलेल्या आदेशाची तपासणी केली असता सदर आदेशातील पोलीस आयुक्त, नागपूर शहर / अमरावती शहर / छत्रपती संभाजीनगर व पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र यांच्या आस्थापनेवरील अनुक्रमे २९, ४, ३, व ६ अशा एकुण ४२ पोलीस निरीक्षक दि.२१/१२/२०२३ रोजी पोलीस स्टेशन मध्ये कार्यरत नसल्यामुळे (Functional पदावर कार्यरत असल्यामुळे) त्यांची जिल्ह्याबाहेर बदल्या देखील या कार्यालयाकडून करणे अभिप्रेत नसल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे मा.मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांनी पडताळणी केलेल्या २३ व या कार्यालयाने पडताळणी केलेल्या ४२ अशा खालीलप्रमाणे एकूण ६५ पोलीस निरीक्षकांच्या जिल्ह्याबाहेर बदल्या करणे अभिप्रेत नव्हते.

५. त्यामुळे महाराष्ट्र पोलीस अधिनियम-१९५१ मधील कलम-२२ न (२) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करुन पोलीस आस्थापना मंडळ क्र.२ यांनी खालील तक्त्यात नमुद पोलीस निरीक्षकांची या कार्यालयाचे दि.३०/०१/२०२४ च्या आदेशान्वये, रकाना क्र.४ मध्ये नमुद केल्या ठिकाणी करण्यात आलेली बदली याद्वारे रद्द करण्याचा निर्णय घेतला असुन, मा.मुख्य निवडणुक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांनी उपरोक्त संदर्भ क्र. १० च्या पत्रान्वये सदरहु बदल्या रद्द करण्यास सहमती दिलेली आहे.

६. तरी, संदर्भ क्र. ४ अन्वये या कार्यालयाने बदली केलेल्या १३० पोलीस निरीक्षकांपैकी खालील नमूद ६५ पोलीस निरीक्षकांची स्तंभ क्र.३ मध्ये दर्शविलेल्या ठिकाणापासून स्तंभ क्र.४ मध्ये दर्शविलेल्या ठिकाणी करण्यात आलेली बदली रद्द करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पोलीस निरीक्षक यांचे नाव | सध्याची नेमणूक | नविन नेमणूकीचे ठिकाण |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 1. | AMOL NANASAHEB FADTARE | DIG GADCHIROLI | PIMPRI CHINCHWAD |
| 2. | PRAMOD GOVINDRAW BANBALE | GADCHIROLI | WARDHA |
| 3. | KAPIL KACHARU GEDAM | GADCHIROLI | SID |
| 4. | ARVINDKUMAR DASHRATH KATLAM | GADCHIROLI | WARDHA |
| 5. | SHYAM GOVINDRAO GAVHANE | GADCHIROLI | CHANDRAPUR |
| 6. | RAJESH DNYANOBA KHANDVE | GADCHIROLI | JALNA |
| 7. | BHANUPRATAP KESHAV MADAVI | NAGPUR CITY | AMRAVATI CITY |
| 8. | ASHOK ANANDRAO KOLI | NAGPUR CITY | THANE CITY |
| 9. | MANISH HARIDAS BANSOD | NAGPUR CITY | AMRAVATI CITY |
| 10. | MANOHAR NAKTUJI KOTNAKE | NAGPUR CITY | AMRAVATI CITY |
| 11. | VAYJAYANTI JANRAO MANDAVDHARE | NAGPUR CITY | PIMPRI CHINCHWAD |
| 12. | VISHWANATH HEMLU CHAVAN | NAGPUR CITY | PIMPRI CHINCHWAD |
| 13. | RAJESH BHIMRAO PUKALE | NAGPUR CITY | THANE CITY |
| 14. | VINOD MANIKRAO CHAUDHARI | NAGPUR CITY | PIMPRI CHINCHWAD |
| 15. | MUKUNDA MADHAV SALUNKE | NAGPUR CITY | THANE CITY |
| 16. | ARVIND VINAYAK BHOLE | NAGPUR CITY | THANE CITY |
| 17. | HARIDAS RAMJI MADAVI | NAGPUR CITY | AMRAVATI CITY |
| 18. | BAPU DATTATRAY DHERE | NAGPUR CITY | PIMPRI CHINCHWAD |
| 19. | JAGVENDRASING NAVALSING RAJPUT | NAGPUR CITY | THANE CITY |
| 20. | DIPAK RAGHUNATHGIRI GOSAVI | NAGPUR CITY | PIMPRI CHINCHWAD |

Scanned with OKEN Scanner

| अ.क्र. | पोलीस निरीक्षक यांचे नाव | सध्याची नेमणूक | नविन नेमणूकीचे ठिकाण |
|---|---|---|---|
| 21. | HANMANT LACHMANNA URLAGONDAWAR | NAGPUR CITY | AMRAVATI CITY |
| 22. | NANDA NITESH MANGATE | NAGPUR CITY | AMRAVATI CITY |
| 23. | ANIRUDH RAMESH PURI | NAGPUR CITY | GADCHIROLI |
| 24. | AMIT ARUN DOLAS | NAGPUR CITY | PIMPRI CHINCHWAD |
| 25. | SANJAY MAHADEV JADHAV | NAGPUR CITY | THANE CITY |
| 26. | SANGRAM ATMARAM SHEWALE | NAGPUR CITY | PIMPRI CHINCHWAD |
| 27. | AMOL ABASAHEB DESHMUKH | NAGPUR CITY | PIMPRI CHINCHWAD |
| 28. | RAJENDRAKUMAR VISHWANATH SANAP | NAGPUR CITY | PIMPRI CHINCHWAD |
| 29. | SHUBHANGI AMITRAO DESHMUKH | NAGPUR CITY | CHATRAPATI SAMBHAJI NAGAR CITY |
| 30. | KAVITA NARAYAN ISARKAR | NAGPUR CITY | AMRAVATI CITY |
| 31. | BABAN BHANUJI YEDGE | NAGPUR CITY | PIMPRI CHINCHWAD |
| 32. | RAVINDRA BABU PAWAR | NAGPUR CITY | THANE CITY |
| 33. | RAVINDRA BABANRAO NAIKWAD | NAGPUR CITY | GADCHIROLI |
| 34. | RAVI SHAMRAO NAGOSE | NAGPUR CITY | GONDIA |
| 35. | BHARAT PANDHARINATH KARHADE | NAGPUR CITY | PIMPRI CHINCHWAD |
| 36. | MANISH MADHUKARRAO THAKARE | AMRAVATI CITY | NAGPUR CITY |
| 37. | RAHUL LIBASRAO ATHAWALE | AMRAVATI CITY | NAGPUR CITY |
| 38. | AASARAM HIRUBHAU CHORAMALE | AMRAVATI CITY | NAGPUR CITY |
| 39. | REKHA DATTATRAY LONDHE | AMRAVATI CITY | CHATRAPATI SAMBHAJI NAGAR CITY |
| 40. | HANUMANT VITTHALRAO GIRME | CHHATRAPATI SAMBHAJINAGAR CITY | AMRAVATI CITY |
| 41. | RAJASHRI GANPATRAO AADE | CHHATRAPATI SAMBHAJINAGAR CITY | NAGPUR CITY |
| 42. | ASHOK RAMALU BHANDARE | CHHATRAPATI SAMBHAJINAGAR CITY | NAGPUR CITY |
| 43. | SHANKAR RAMBHAU DAMASE | PIMPRI CHINCHWAD | THANE CITY |
| 44. | SHAILESH SUDHAKAR GAIKWAD | PIMPRI CHINCHWAD | NAGPUR CITY |
| 45. | SHANKAR SHRIRANG BABAR | PIMPRI CHINCHWAD | THANE CITY |
| 46. | DNYANESHWAR DASHRATH SABLE | PIMPRI CHINCHWAD | THANE CITY |
| 47. | DIPALI DATTATRAY DHADAGE | PIMPRI CHINCHWAD | NAGPUR CITY |
| 48. | PRASAD SHANKAR GOKULE | PIMPRI CHINCHWAD | NAGPUR CITY |
| 49. | SUNIL JAYWANT PINJAN | PIMPRI CHINCHWAD | NAGPUR CITY |
| 50. | VISHWAJIT VASANT KHULE | PIMPRI CHINCHWAD | NAGPUR CITY |
| 51. | BALKRISHNA SAHEBRAO SAWANT | PIMPRI CHINCHWAD | NAGPUR CITY |
| 52. | DIPAK RAMDAS SALUNKHE | PIMPRI CHINCHWAD | THANE CITY |
| 53. | SHAHAJI NARAYAN PAWAR | PIMPRI CHINCHWAD | SOLAPUR CITY |
| 54. | ARVIND SUDAM PAWAR | PIMPRI CHINCHWAD | NAGPUR CITY |
| 55. | ANIL ATMARAM DEVDE | PIMPRI CHINCHWAD | CHATRAPATI SAMBHAJI NAGAR CITY |
| 56. | VINAYAK BAJIRAO VETAL | PUNE CITY | SOLAPUR CITY |
| 57. | RAJU THANSING CHAVAN | PUNE CITY | NAGPUR CITY |



Scanned with OKEN Scanner

| अ.क्र. | पोलीस निरीक्षक यांचे नाव | सध्याची नेमणूक | नविन नेमणूकीचे ठिकाण |
|---|---|---|---|
| 58. | MALOJI BAPUSAHEB SHINDE | THANE CITY | PIMPRI CHINCHWAD |
| 59. | SACHIN SAKHARAM GAVADE | THANE CITY | NAGPUR CITY |
| 60. | ARJUN MADAN GARAD | THANE CITY | NAGPUR CITY |
| 61. | SUKHADEV MANIK PATIL | THANE CITY | AMRAVATI CITY |
| 62. | GITARAM LAXMAN SHEVALE | THANE CITY | NAGPUR CITY |
| 63. | DNYANESHWAR SHRIRAM AVHAD | THANE CITY | NAGPUR CITY |
| 64. | ATUL SADASHIV LAMBE | THANE CITY | GADCHIROLI |
| 65. | VIKAS GANPATRAO DHAS | SATARA | NAGPUR CITY |

५/३/२०२४

(संजीव कुमार सिंघल)
अपर पोलीस महासंचालक (आस्थापना),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांचेकरीता.

प्रत,

पोलीस आयुक्त, पुणे शहर / पिंपरी-चिंचवड / ठाणे शहर / नागपूर शहर / अमरावती शहर /सोलापूर शहर / छत्रपती संभाजीनगर शहर

आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई

परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र / छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्र / नागपूर परिक्षेत्र

पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर

पोलीस अधीक्षक, सातारा / जालना / वर्धा / चंद्रपूर / गडचिरोली / गोंदिया

२. उपरोक्त तक्त्यात रकाना क्र.४ मधील नमुद घटक प्रमुखांनी या आदेशाची प्रत संबंधीत पोलीस अधिकाऱ्यांना तात्काळ बजावून त्यांना त्यांच्या सध्याच्या घटकातून पूर्वीच्या घटकात हजर होण्यासाठी विनाविलंब कार्यमुक्त करावे. तसेच, सदर आदेशाची प्रत त्यांना प्राप्त झाल्याबाबत त्यांची दिनांकासहीत स्वाक्षरी घ्यावी व ती पोच या कार्यालयास पाठवावी. पोलीस अधिकाऱ्यांना कार्यमुक्त करताना पर्यायी / बदलीवर येणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांची वाट पाहू नये. तसेच, संबंधीत पोलीस अधिकाऱ्यांना पदग्रहण अवधी न उपभोगता तात्काळ पूर्वीच्या नेमणूकीच्या ठिकाणी हजर होण्याचे लेखी निर्देश देखील द्यावेत. संबंधीत पोलीस अधिकाऱ्यांना कार्यमुक्त केले नाही, तर त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधीत घटक प्रमुखांवर राहील. त्याचप्रमाणे पोलीस अधिकारी पूर्वीच्या नेमणूकीच्या ठिकाणी हजर होण्यासाठी कार्यमुक्त करुनही विहित वेळेत हजर झाले नाहीत, तर ते शिस्तभंगविषयक कार्यवाहीस पात्र राहतील.

३. सदर बदलीच्या आदेशामुळे ज्या जागा रिक्त राहणार आहेत, त्या ठिकाणांचा कार्यभार संबंधित घटक प्रमुखांनी त्यांच्या घटकातील इतर पोलीस अधिकाऱ्यांकडे तात्काळ सोपवावा.

४. **मा.न्यायालयाचे अथवा मा.न्यायाधिकरणाचे आदेश असल्यास त्याप्रमाणे कार्यवाही करावी.**

५. ज्या ठिकाणी स्थानिक निवडणूक संबंधाने आचारसंहिता लागू आहे, त्या ठिकाणांच्या अधिकाऱ्यांना आचारसंहिता समाप्त झाल्यानंतर तात्काळ कार्यमुक्त करावे.

६. तसेच, मा.केंद्रीय निवडणूक आयोगाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या सूचनांचे तंतोतंत पालन करण्यात यावे व या सूचनांचा भंग होणार नाही याची दक्षता घ्यावी.

७. स्तंभ क्र.३ मध्ये नमूद हजर झालेल्या पोलीस अधिकाऱ्यांना घटकांतर्गत पदस्थापना देताना मा.केंद्रीय निवडणूक आयोगाने दि.२१/१२/२०२३ व दि.२३/०२/२०२४ च्या पत्रान्वये दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन होणार नाही, याची संबंधीत घटक प्रमुखांनी नोंद घ्यावी.

८. सदरचे आदेश घटक कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे निर्गमित करण्यात येत असून त्यामध्ये काही त्रुटी राहिल्या असल्यास तसे या कार्यालयास कळवून पुढील आदेशाची वाट पहावी / काही अधिकाऱ्यांची तक्रार असल्यास ह्या कार्यालयास त्वरित कळवावी.

Scanned with OKEN Scanner

९. पूर्वीच्या नेमणूकीच्या ठिकाणी हजर होण्यासाठी कार्यमुक्त केल्यानंतर जे पोलीस अधिकारी रुग्ण निवेदन करतील अथवा गैरहजर राहतील त्यांना रुग्णनिवेदनाच्या तारखेपासून स्थित कार्यमुक्त (Stand relieved) करण्यात यावे, व त्यांना कार्यमुक्त केल्याचा आदेश त्यांच्या निवासस्थानी बजावावा.

१०. उपरोक्त घटक प्रमुखांनी त्यांच्या घटकात हजर झालेल्या पोलीस अधिकाऱ्यांची नांवे व त्यांच्या घटकातून पूर्वीच्या नेमणूकीच्या ठिकाणी हजर होण्यासाठी कार्यमुक्त केलेल्या पोलीस अधिकाऱ्यांची नावे दिनांकासह या कार्यालयास तातडीने कळवावीत. तसेच जे पोलीस अधिकारी पूर्वीच्या नेमणूकीच्या ठिकाणी हजर होण्यासाठी कार्यमुक्त करुनही तात्काळ हजर झाले नाहीत त्यांचा कार्यमुक्त केल्याचा दिनांक या कार्यालयास कळवून त्यांच्याविरुध्द घटक प्रमुखांनी या कार्यालयाचे क्र.पोमसं/३/५५०७/०६/९७, दि.१३/०२/१९९७ च्या परिपत्रकातील सूचनांप्रमाणे शिस्तभंगविषयक कार्यवाही तातडीने सुरु करावी. सदरची माहिती या कार्यालयातील लक्षवेध:- कार्यासन अधिकारी, का.क्र. ३ यांना ई-मेलद्वारे [desk3.dgoffice@mahapolice.gov.in] पाठवावी.

**प्रत सविनय सादर,**

अपर मुख्य सचिव (गृह), महाराष्ट्र शासन, मंत्रालय, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई-३२.

**(लक्षवेध :-** कक्ष अधिकारी, पोल-५ब)

मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-३२.

महालेखाकार-०१, महाराष्ट्र राज्य, मुंबई / महालेखाकार-०२, महाराष्ट्र राज्य, नागपूर.

**प्रत आवश्यक त्या कार्यवाहीसाठी,**

कार्यालय अधीक्षक, का. क्र. २ / ९ / ११ / ३६ व ४० (पोमसं कार्यालय).

**प्रत,**

पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष, पोमंस., कार्यालय, मुंबई.

२/- यांनी सदरचे आदेश लोकसभा सार्वत्रिक निवडणुका - २०२४ च्या अनुषंगाने पोलीस निरीक्षक यांचे बदली रद्द करण्याबाबतचे आदेश (Cancellation of transfer order of Police Inspectors for General Elections to Loksabha - २०२४) या विषयाखाली पोलीस महासंचालक कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर ०१ महिन्यासाठी उपलब्ध करुन द्यावेत.

Scanned with OKEN Scanner